दिनांक १५.०४.२०२३.

शपथेवर उर्वरीत उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे – श्री. सी.एस.लाहबर, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु

०९. हे खरे आहे की, दिनांक ३०.०५.२०१३ रोजी अशोक चरपे यांना दिलेल्या बांधकामाची परवानगी दिनांक २८.०६.२०१३ रोजीच्या पत्रान्वये स्थगीत करण्यात आली होती व नगर परीषद नियमाप्रमाणे कार्यवाही करणार होते. दिनांक ३०.०५.२०१३ रोजीच्या पत्रास **आर्टिकल 'अ'** देण्यात येते. हे खरे आहे की, नगर परीषदने दिनांक ०७.०१.२०१३ रोजी वादी अशोक चरपे यांना खड्डे बुजवण्यासंदर्भात पत्र दिले होते आणि खड्डे न बुजवील्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे नमूद केले होते. दिनांक ०७.०७.२०१३ च्या पत्रास **आर्टिकल 'ब'** देण्यात येते. हे खरे आहे की, दिनांक १२.०७.२०१३ रोजी आमच्या कार्यालयातून कर संग्राहक यांच्यामार्फत प्रतिवादीला पत्र देण्यात आले होते. सदर १२.०७.२०१३ च्या पत्रास **आर्टिकल 'क'** देण्यात येते. दिनांक १७.०७.२०१३ रोजी कर विभागातर्फे मुकुंदा नाईक, अशोक चरपे व पुरुषोत्तम नाईक यांना पत्र देण्यात आले होते. सदर पत्रास **आर्टिकल 'ड'** देण्यात येते. हे खरे आहे की, दिनांक १०.०७.२०१४ रोजी आमच्या कार्यालयाने अशोक चरपे यांना बांधकाम परवानगी रद्द केल्यासंदर्भात पत्र पाठवीले होते. दिनांक १०.०७.२०१४ रोजीच्या पत्रास **आर्टिकल 'इ'** देण्यात येते.

१०. हे खरे आहे की, वादग्रस्त मिळकत प्रतिवादी यांची सामाईक वापरण्याची जागा होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींच्या सामाईक जागेवर वादी यांना बांधकाम करण्याचा अधिकार नव्हता म्हणून आम्ही वादीची बांधकाम परवानगी रद्द केली. साक्षीदार सांगतात की, मालकी हक्काचा वाद निर्माण झाल्याने परवानगी रद्द केली. हे खरे आहे की, वादीची बांधकाम परवानगी रद्द केल्यानंतर आजपर्यंत वादी अशोक चरपेने पून्हा परवानगी अर्ज आमच्या कार्यालयात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांच्या हक्कात फेरफार मंजूर झाला नव्हता हे देखील बांधकाम परवानगी रद्द करण्यामधील एक कारण होते.

११. हे खरे आहे की, प्रतिवादींनी आमच्या कार्यालयात पत्रव्यवहार केला होता. वर्णनयादी निशाणी क्र.८७/२ ते ८७/७ वर प्रतिवादींनी दाखल केलेले अर्ज दाखवीण्यात आले, त्यावर पोच म्हणून आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे. सदर दस्तांना **पोहोचपूर्ते एकत्रात**

निशाणी क्र.८८ देण्यात येते. निशाणी क्र.८७/८ वर आमच्या कार्यालयातील पत्र आहे. सदर पत्रावर माझ्या वतीने कनिष्ठ क्लर्क शेंभेकर यांनी सही केली आहे. त्यास **आर्टिकल 'फ'** देण्यात येते. दिनांक २८.०६.२०१३ रोजी आमच्या कार्यालयास प्रतिवादींनी अर्ज सादर केला होता त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे, त्यास **पोहोचपूर्ते निशाणी क्र.८९** देण्यात येते. दिनांक १४.०६.२०१३ रोजी आमच्या कार्यालयास प्रतिवादींनी दोन अर्ज केले होते त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे, त्यास **पोहोचपूर्ते एकत्रात अनुक्रमे निशाणी क्र.९० व ९१** देण्यात येते. वर्णनयादी निशाणी क्र.८७/२० वर दिनांक १९.०६.२०१३ रोजी प्रतिवादींनी आमच्या कार्यालयात दिलेला अर्ज दाखवीण्यात आला, त्यावर आमच्या कार्यालयाची पोच आहे. **पोहोचपूर्ते निशाणी क्र.९२** देण्यात येते. वर्णनयादी निशाणी क्र.८७/२१ वर दिनांक २५.०४.२०१३ रोजी प्रतिवादींनी आमच्या कार्यालयात दिलेला अर्ज दाखवीण्यात आला, त्यावर आमच्या कार्यालयाची पोच आहे. **पोहोचपूर्ते निशाणी क्र.९३** देण्यात येते. वर्णनयादी निशाणी क्र.८७/२३ ते ८७/२५ वर दिनांक ०४.०७.२०१३ व २२.०७.२०१३ रोजी प्रतिवादींनी आमच्या कार्यालयात दिलेला अर्ज दाखवीण्यात आला, त्यावर आमच्या कार्यालयाची पोच आहे. **पोहोचपूर्ते एकत्रात निशाणी क्र.९४** देण्यात येते.

१२. हे म्हणणे खरे नाही की, मी स्थळ पाहणी केल्यानंतर माझ्या असे निदर्शनास आले की, वादग्रस्त मिळकत प्रतिवादींच्या मालकीची आहे. हे खरे आहे की, वादीची बांधकाम परवानगी रद्द केल्यानंतर वादीने आमच्या कार्यालयात त्याबाबत अपील दाखल केली नाही. हे खरे आहे की, वादीने आजपर्यंत त्यांच्या ईमारतीचे पूर्ण बांधकाम केले नाही. वादी यांनी आम्ही स्थगीती दिल्यानंतर देखील बांधकाम सुरु ठेवले म्हणून परवानगी रद्द केली.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती
समक्ष

दिनांक १५.०४.२०२३.

(आर. बी. कुलकर्णी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
तथा प्र. श्रे. न्या. दं., सावनेर.

Certificate

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- A. S. Mahurkar.